Original Set

# महाराष्ट्र शासन

सहसंचालक

उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई

एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१

ई.मेल- Jd@jdhemumbai.org.in , web-www. jdhemumbai.org.in दूरध्वनी क्रमांक-022-22691528, 22656600

क्र. /वेप-१,२,३/मान्यता/(१३)/२०११-१२/413

दिनांक- २९/८/२०११

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन आदेश क्र. एनजीसी-२०११/(१२१/११)/मशि-४, दि.३/८/२०११ नुसार, जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी, वाणिज्य, विज्ञान आणि इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालय, जोगेश्वरी (पु), मुंबई ४०००६० या महाविद्यालयास २०११-१२ या वर्षाकरीता उपरोक्त शासन निर्णयातील मधील अटी व शर्तीना अनुसरुन तात्पुरती (provisional) स्वरुपात पदवी स्तरावर नवीन एफ. वाय. बी. कॉम. (१ अतिरिक्त तुकडी) कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी दिली आहे. शासन आदेशातील नमुद केलेल्या अटी व शर्तीना अनुसरुन संस्था/ महाविद्यालयाकडून रु.१००/- भारतीय गैर न्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त नवीन अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी केली जाणार नाही असे हमीपूर्वक हमीपत्र शासननिर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४" अंतर्गत तरतुदीनुसार मर्यादीत विद्यार्थी प्रवेश आणि यु.जी.सी. कडील मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यास तसेच शासन आदेशातील सुचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या/महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नविन महाविद्यालय/ विषय/तुकड्या/विद्याशाखा/ अभ्यासक्रमांसाठी पुढील संलग्नीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

स्थळ-मुंबई-४०० ००१
दिनांक २९/८/२०११

Wane

प्र. सहसंचालक
उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई

प्रत,

कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई.

तसेच त्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्नीकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे विद्याशाखांचे/विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणा-या बाबी पूर्ण करण्याच्या सुचना तसेच बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई,/ एआय. सी.टी.ई, यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनः संस्थेच्या/महाविद्यालयाच्या निर्देशनास आणून द्याव्यात.

ही मान्यता फक्त शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता मर्यादित असल्याने या वर्षी नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/विषय/तुकड्या सुरु न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच शासन आदेशानुसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्नीकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.